**G + 1 घर विकणे आहे**

जुळे सोलापूर येथे प्राइम लोकेशनमध्ये सु-निर्मित G + 1 घर विकणे आहे. भूखंड क्षेत्र : ११२० चौ. फूट. बिल्ट-अप क्षेत्र : ९७० चौ. फूट. बांधकाम : Ground floor-1BHK टॉयलेट, बाथरूम. पहिला मजला - १ रूम, टॉयलेट, बाथरूम. (विस्तृत आणि हवेशीर)

ठिकाण : १२४, शिवगंगा नगर भाग २, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर, भरपूर नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन, शाळा, डी मार्ट, बाजारपेठ यांच्या जवळ.

अपेक्षित किंमत : ७३ लाख + टॅक्स

संपर्क : माशाळकर दयानंद - ९४२३३३१७५२, सदानंद माशाळकर - ९९२४१४८९७०-७८

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

**लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय**

फक्त ५१०००/- रु.

जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**

अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट

मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १५२ वा | शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

**हुरडा पार्टी**

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591

# फडणवीस निष्क्रिय गृहमंत्री, महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर

## पोकळ विधानं करण्यापेक्षा ठोस कृती करण्याचं धाडस दाखवावं, काँग्रेसचा हल्लाबोल

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतर महायुती सरकारवर चौफेर टीका होत आहे. पद्मश्री पुरस्काराने सन्मानित अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेला जीवघेणा हल्ला महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा आहे.



मुंबईतील वांद्रे या वर्दळीच्या भागात अशा घटना होत असतील तर मुंबईत कोण सुरक्षित आहे? मुंबई, पुणे, बीड, परभणी, नागपूरमधील वाढत्या गुन्हेगारी घटना पाहता राज्यात गृहमंत्री आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे, असा हल्लाबोल काँग्रेसने केला. महायुती सरकारमध्ये गुंडाराज फोफावले असून सैफ अली खान वरील हल्ला हे गुंडांनी महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्था दिलेले आव्हान आहे. महायुती सरकारच्या काळात गुंडाराज फोफावले असून हे सरकारचे अपयश आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. भाजप सरकारमध्ये गुन्हेगारांचे मनोबल वाढले असून मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह त्यांच्या लाडक्या पोलीस महासंचालक अत्यंत निष्क्रिय आहेत. मुंबईला दोन पोलीस आयुक्त आहेत तरीही ना राज्यात कायदा सुव्यवस्था आहे ना मुंबईत.

बीडमधील संघटीत गुन्हेगारी व त्याला असलेले राजकीय आशिर्वाद, परभणीत पोलीस कोठडीत मृत्यू, वांद्र्यात माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची गोळ्या घालून हत्या, अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार या गंभीर घटना आहेत. गृहमंत्री पद सांभाळण्यात फडणवीस अपयशी ठरले आहेत. राज्यात सेलिब्रिटी, सत्ताधारी पक्षाचे नेते, सर्वसामान्य जनता कोणीही सुरक्षित नाही, अशी टीका पटोले यांनी केली.

गुन्हेगारांना सोडणार नाही, कठोर शिक्षा करू अशा विधानांचे पालुपद सोडून काहीतरी कठोर कारवाई करण्याची हिम्मत मुख्यमंत्र्यांनी दाखवावी. राज्यात गुन्हेगारी वाढत असताना फडणवीस गंभीर नसल्याचे दिसत आहे. अभिनेता सैफ अली खानवर जीवघेणा हल्ला झाल्यानंतर त्याची गंभीर दखल घेण्याऐवजी मुख्यमंत्री फडणवीस चित्रपटांच्या प्रमोशनमध्ये व्यस्त होते. असा निष्क्रीय व कमजोर गृहमंत्री महाराष्ट्राला लाभले हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, असा टोलाही पटोले यांनी लगावला.

## ‘खंडणीच्या आड आल्याने देशमुख यांची हत्या’; युक्तिवादात विशेष तपास पथकाचा संशय

**बीड (कटूसत्य वृत्त):-** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मीक कराड याची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथकास जिल्हा न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. हत्येच्या दिवशी मस्साजोगचे सरपंच देशमुख यांना कराड याने दिलेली धमकी, विष्णू चाटेच्या फोनवरून वाल्मीक कराडने अवादा कंपनीच्या अधिकाऱ्याकडे दोन कोटींची मागितलेली खंडणी आदी तपासातील बाजू राज्य गुन्हे अन्वेषण, विशेष तपास पथकाकडून न्यायालयात मांडण्यात आल्या.



खंडणीच्या आड संतोष देशमुख येत असल्यामुळेच त्यांना संपवण्यात आले का, असा संशय असल्याचा युक्तिवादही करण्यात आला. कराडशी आरोपींचे केवळ फोनवरून संभाषण झाले. यावरून खुनाशी संबंध जोडून आणि मकोकाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला

(पान ८ वर) (पान १ वरून)

का, अशी विचारणा बीड जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती सुरेखा पाटील यांनी तपास अधिकाऱ्यांना केला. त्यावर तांत्रिक पुरावे, फोनवरून झालेले संभाषण, ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण आणि हत्या झाली त्या वेळी आरोपी विष्णू चाटे व सुदर्शन घुले यांचे कराड याच्याशी झालेले संभाषण, हत्येच्या दिवशीही संतोष देशमुख यांना कराड याने दिलेली धमकी, विष्णू चाटेच्या फोनवरून वाल्मीक कराडने अवादा कंपनीच्या अधिकाऱ्याकडे दोन कोटींची मागितलेली खंडणी आदी तपासातील बाजू राज्य गुन्हे अन्वेषण, विशेष तपास पथकाकडून न्यायालयात मांडण्यात आल्या. वाल्मीक कराडची परदेशात कुठे कुठे मालमत्ता आहे, याचीही चौकशी करायची असल्याचे सरकारी पक्षाकडून न्यायालयात सांगण्यात आले. वरील मुद्द्यांवरून वाल्मीक कराडला १५ दिवसांची पोलीस कोठडी देण्याची विनंती करण्यात आली. त्याला वाल्मीक कराडचे वकील ॲड. सिद्धेश्वर ठोंबरे यांनी विरोध केला.

## वाघाला पकडण्यासाठी येडशीत सापळा

**येडशी (कटूसत्य वृत्त):-** वाघाला पकडणारे ताडोबा अभयारण्यातील तज्ज्ञांचे पथक सोमवारी बार्शीत दाखल झाले. मंगळवारी या पथकाने येडशी येथील रामलिंग अभयारण्य व आसपासच्या परिसरात वाघ ज्याठिकाणी आढळून आला त्या ठिकाणांची पाहणी केली.



वाघाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी वनविभागाने रामलिंग अभयारण्यासह आणखी तीन ते चार विविध ठिकाणी कॅमेरे लावले आहेत. वाघाला बेशुद्ध करून पकडण्याचे नियोजन या पथकाकडून करण्यात आले आहे.

मंगळवारी सकाळी १० वाजता तज्ञांच्या पथकाने रामलिंग अभयारण्य व ढेंबरेवाडी वनपरिक्षेत्रात वाघाचा वावर असलेल्या तलाव परिसरासह विविध ठिकाणी पाहणी केली. या पथकाने वाघाचा वावर असलेल्या मार्गावर मिळणारे खाद्य, पाणी पिण्याचे ठिकाण, त्याचे वास्तव्य याची पाहणी व अभ्यास सुरू केला आहे.

तज्ज्ञांच्या मोहिमेने दिलासा मिळाला असून वाघ सुरक्षितपणे जेरबंद होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वन विभागाने या मोहिमेला प्राधान्य देत नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

तीन जिल्ह्यांच्या परिसरात पाहणी

ताडोबा येथील तज्ज्ञ पथकाने डोंगराळ भागातील तब्बल १० ते १२ किलोमीटर परिसराची पाहणी करून माहिती घेतली. यावेळी त्यांच्यासोबत सोलापूर, धाराशिव, लातूर, उदगीर, भूम, आणि बार्शी येथील वनअधिकारी, कर्मचारी, प्राणीमित्र आदी मदतीसाठी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील चार कारखान्यांना विनापरवाना ऊस गाळप प्रकरणी नोटीस

### साखर आयुक्तालयाची कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील यंदाचा ऊस गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील चार साखर कारखान्यांनी विनापरवाना ऊस गाळप सुरू केल्याचे समोर आले. त्याची गंभीर दखल साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांनी घेत संबंधित कारखान्यांना नोटीस बजावली आहे.



याबाबतची सुनावणी येत्या शुक्रवारी (दि.१७) साखर आयुक्तालयात दुपारी बारा वाजता ठेवण्यात आली आहे. त्यामध्ये दोन सहकारी आणि दोन खासगी साखर कारखान्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण, ऊस गाळप आणि ऊसपुरवठा नियमन) आदेश १९८४ व त्यामध्ये झालेल्या सुधारणानुसार हंगाम सुरू करण्यापूर्वी गाळप परवाना घेणे बंधनकारक आहे. साखर आयुक्तालयाच्या दि. ८ ऑगस्ट २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार साखर कारखान्यांनी गाळप परवाना प्राप्त करून घेऊनच गाळप हंगाम सुरू करावा, अशा सूचना सर्व सहकारी, खासगी साखर कारखान्यांना दिलेल्या आहेत.

असे असतानाही गोकूळ शुगर इंडस्ट्रिज लिमिटेड, धोत्री (ता. दक्षिण सोलापूर), मातोश्री लक्ष्मी को-जनरेशन इंडस्ट्रिज लिमिटेड, रुद्देवाडी (ता. अक्कलकोट), श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना लि., मंगळवेढा (ता. मंगळवेढा), भीमा सहकारी साखर कारखाना लि., टाकळी सिकंदर (ता. मोहोळ) या साखर कारखान्यांनी गाळप परवाना प्राप्त करून न घेता ऊस गाळप हंगाम २०२४-२५ सुरू केल्याचे प्रादेशिक साखर सहसंचालक (सोलापूर) यांनी दिलेल्या पत्रान्वये कळविले आहे. संबंधित कारखान्यांनी विनापरवाना गाळप सुरू केल्याने कायद्याचे व दि. १४ ऑक्टोबर २०१५ चे पालन न केल्याने आदेशातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे. अशी कारवाई करण्यापूर्वी आपणास म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येत आहे. त्यानुसार राज्याचे साखर आयुक्त तथा परवाना अधिकारी यांच्यासमोर १७ जानेवारीस दुपारी बारा वाजता हजर राहण्याची नोटीस साखर संचालक (प्रशासन) डॉ. केदारी जाधव यांनी संबंधित साखर कारखान्यांना दिलेली आहे. दरम्यान, विनापरवाना ऊस गाळप केल्यास संबंधित साखर कारखान्यांने गाळप केलेल्या उसावर प्रतिमेट्रिक टनास ५०० रुपयांइतकी दंडात्मक कारवाई करण्यात येते. याबाबत कारवाईचे चित्र सुनावणीनंतर स्पष्ट होण्याची अपेक्षा असल्याची माहिती साखर आयुक्तालयातून देण्यात आली.

## तीन वर्षे पाणीपट्टी न भरल्यास सात-बारावर बोजा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मागील काही वर्षांपासून सिंचन प्रकल्पातील पाणी वापरल्यानंतरही त्याची पाणीपट्टी वसुली होत नव्हती. त्यामुळे राज्याच्या जलसंपदा विभागाने कडक पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे.



आता तीन वर्षे पाणीपट्टी न भरल्यास संबधित सात-बारा उतार्‍यावर बोजा चढविण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे

.प्रलंबित सिंचन पाणीपट्टीसाठी संबंधीत कार्यकारी अभियंता जमीन महसुली वसुली अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतुदीनुसार प्रदान केलेल्या अधिकाराप्रमाणे महसुली वसुली प्रमाणपत्र काढल्यानंतर जिल्हाधिकार्‍यांमार्फत सातबारा उतार्‍यावर बोजा चढविला जाणार आहे. दरम्यान, पाणीपट्टी वसुलीसाठी विभाग स्तरावर दरवर्षी 15 जानेवारी ते 31 मार्च दरम्यान विशेष मोहीम राबविण्याच्या सूचनाही जलसंपदा विभागाने अधिकार्‍यांना दिल्या आहेत. आता वसुलीला गती येणार आहे.गेल्या ऑक्टोबरमध्ये जलसंपदा विभागाची पाणीपट्टी मोजणी, आकारणी व वसुलीबाबत पारदर्शक पर्याय, मार्गदर्शक तत्त्वे व उपाययोजना करून पाणीपट्टी वसुली वाढावी याबाबत विविध पर्याय, उपाययोजना करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. पाणीपट्टी थकबाकी वसुली होण्यासाठी पाणी वापर संस्थांनी केलेल्या वसुलीच्या 50 टक्के रक्कम प्रोत्साहन म्हणून पाणी वापर संस्थांना दिली जाणार आहे.

त्यातून पाणी वापर संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील. पाणीपट्टी वसुलीसाठी जिल्हाधिकार्‍यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय वसुली समिती असेल.

## पाटील, तुमच्यामुळेच आम्हाला कुणबी प्रमाणपत्र मिळाले...

### माढा तालुक्यातील मराठा बांधवांच्या भावना

**माढा (कटूसत्य वृत्त):-** "पाटील, तुम्ही सुरू केलेल्या मराठा आरक्षण आंदोलनामुळेच संपूर्ण राज्यात जनजागृती झाली असून गावोगावी कुणबी नोंदी सापडत आहेत. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत, त्यांना कुणबी प्रमाणपत्रही मिळू लागले आहे ही सर्व आपलीचं देण आहे," अशा शब्दात माढा तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख यांनी भावना मराठा युद्ध मनोज जरांगे पाटील यांच्याकडे व्यक्त केल्या. मराठा



योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी प्रवर्गामध्ये कुणबी प्रवर्गही असून राज्यातील अनेक भागात असलेल्या कुणबी नोंदी शोधून तेथील कुणबी समाजालाही ओबीसी प्रवर्गामध्ये समाविष्ट करावे, या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे आंदोलन सुरू केले. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये कुणबी नोंदी सापडल्या. माढा तालुक्यातील

(पान 2 वर..)

## खा. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली उजनी प्रकल्पग्रस्त व गावठाण संदर्भात चर्चा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील उजनी प्रकल्पग्रस्त व गावठाण पुनर्वसनासंदभार्तील प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.



या बैठकीत उजनी धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या गावांच्या पुनर्वसनासंदभार्तील समस्या, पुनर्वसन योजनेतील अडथळे, व नवीन पुनर्वसन धोरणांची अंमलबजावणी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याचबरोबर गावठाणांतील पायाभूत सुविधा, आणि आर्थिक मदतीचे विषय मांडण्यात आले.

खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न तत्काळ सोडवण्यासाठी प्रशासनाला ठोस पावले उचलण्याचे निर्देश दिले. त्यांनी सांगितले की, प्रकल्पामुळे प्रभावित झालेल्या लोकांच्या हक्कांसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.पुनर्वसनासंदभार्तील संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.

या बैठकीस आ.अभिजीत पाटील, समाधान आवताडे,आ. राजू खरे,प्रांत अधिकारी सचिन इथापे,उपमुख्यअधिकारी जि.प शेळकंदे,सुनिल वाळुंजकर,पोलीस उपाधिक्षक अर्जुन भोसले,भूमिलेख उपाधिक्षक अवताडे,गटविकास अधिकारी संसारे,विविध शासकीय अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, व प्रकल्पग्रस्त नागरिक उपस्थित होते.

उपस्थितांनी आपल्या समस्या व मागण्या मांडल्या ही बैठक प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांकडे प्रशासनाने गांभीयार्ने पाहण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे.

## गड्डा यात्रेत चाईल्ड हेल्पलाईन 1098 ची यंत्रणा कार्यान्वित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथे सालाबाद प्रमाणे श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर महाराजांची गड्डा यात्रा भरली आहे. यात्रेत मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत असून, यात्रेत हरवलेल्या बालकांचा शोध घेऊन अथवा सापडलेले बालक पोलीसांच्या मदतीने त्यांच्या पालकांपर्यंत सुखरूप पोहोचविण्याकरीता जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय व जिल्हा बालसंरक्षण कक्ष अंतर्गत चाईल्ड लाईन 1098 ची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली माहिती जिल्हा बाल संरक्षण अधिकारी रेशमा गायकवाड यांनी कळविले आहे.

तसेच ज्या बालकांना काळजी व संरक्षणाची गरज आहे. अशा बालकांना सेवा येत असून, यात रस्त्यावरील बालके, बालकामगार शोषित बालके, देह विक्रिस बळी पडलेले बालके, व्यसनाधिन बालके, संघर्षग्रस्त बालके, मतिमंद बालके एच. आय.व्हि./ एड्स ग्रस्त बालके आपत्ती ग्रस्त बालके, कौटुंबिक कलहास बळी पडलेले बालके, वैद्यकिय मदतीसाठी, निवाऱ्याच्या शोधात असलेले, हरवलेले बालके परत पाठविण्यासाठी, शोषणापासून संरक्षण, भावनिक मदत व मार्गदर्शन माहिती व संदर्भ सेवेकरीता कार्यरत असून जर अशी कोणती बालके निदर्शनास आल्यास तात्काळ होम मैदान पोलीस चौकीशी संपर्क साधवा अथवा चाईल्ड हेल्पलाईन च्या टोल फ्री नंबर 1098 वर कळवावे असे आवाहनही जिल्हा बालसंरक्षण अधिकारी रेशमा गायकवाड यांनी केले आहे.

श्रीहरी बहुउद्देशीय व संशोधन संस्था, संचलित


**शार्वी अभ्यासिका**

दि. १५ ऑगस्ट २०२४ पासून आपल्या सेवेत

**जुळे सोलापूरातील पहिली अत्याधुनिक अभ्यासिका**

वैशिष्ट्ये

- वातानुकूलित सुसज्ज इमारत, प्रसन्न वातावरण व माफक फी
- शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था प्रत्येक जागा आरक्षित
- मुलां-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था स्वतंत्र प्रसाधनगृह
- दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
- आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प प्रदुषणमुक्त वातावरण
- लॅपटॉप, मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईट मर्यादित प्रवेश क्षमता
- वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन वाहन तळाची सोय
- वर्षभरासाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत



पत्ता : एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर.

संपर्क : (०२१७) २६०५०९१ /८८५६९२७९४७

# वडाचीवाडी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबध्द - रणजितसिंह शिंदे

**माढा (कटूसत्य वृत्त):-** वडाचीवाडी ग्रामपंचायत, पाणी फाउंडेशन टीम व ग्रामस्थांच्या एकजुटीतून गावाने विविध बक्षीसे जिंकून जिल्ह्यात नावलौकिक मिळविला आहे.त्यांच्या मागणीनुसार वेळोवेळी माजी आमदार बबनराव शिंदे व मी शासनाच्या विविध योजनांमधून भरघोस निधी उपलब्ध करून दिला आहे. यापुढेही गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सदैव कटिबध्द असल्याचे सांगून बार्शी उपसासिंचन योजनेतून माढा तालुक्यातील चार गावांना बंदिस्त पाईपलाईनद्वारे मिळणाऱ्या पाण्याचे काम अंतिम टप्प्यात असून पुढील आवर्तनात या गावांना नक्कीच पाणी मिळेल असे प्रतिपादन जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी केले आहे.

ते वडाचीवाडी (अं.उ.) ता.माढा येथील आमदार बबनदादा शिंदे ऑक्सिजन पार्कमध्ये माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या प्रयत्नातून डिपीडीसीमधून मंजूर केलेल्या 35 लाख निधीतून उभारण्यात येणाऱ्या भव्य फंक्शन हॉलच्या भूमिपूजनाच्या वेळी बोलत होते.

यावेळी चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी पाच एकर ओसाड माळरानावर सुमारे 14 हजार वृक्षांचे संवर्धन करुन पर्यावरण संवर्धनासाठी तयार केलेल्या ऑक्सीजन पार्क व मियावाकी जंगलाची पाहणी केली.बार्शी उपसासिंचन योजनेतून बंदिस्त पाईपलाईनद्वारे सुरू असलेल्या कामाची पत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मोबाईलवरून फोन करून लवकरात लवकर काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने सूचना केल्या.

यावेळी रणजितसिंह शिंदे यांनी पदाधिकारी, ग्रामस्थ,युवक व शेतकरी यांच्यासमवेत दिलखुलास व मनसोक्त गप्पागोष्टी केल्या.त्यांचे प्रश्न,समस्या व अडीअडचणी जाणून घेतल्या.सर्व सभासद शेतकऱ्यांच्या ऊसाचे गाळप केले जाणार असल्याचे सांगून भविष्यात जनतेचे प्रश्न व समस्या टप्प्याटप्प्याने सोडविण्याची ग्वाही त्यांनी दिली.



यावेळी दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांचा व विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक यांना महाराष्ट्र राज्य कृती समितीचा जिल्हास्तरीय कृतीशील शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल व माढा प्रेस क्लबच्या नूतन कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राजेंद्र गुंड सर यांचा वडाचीवाडी ग्रामस्थांच्या वतीने सरपंच रमेश भोईटे व पाणी फाउंडेशनचे प्रणेते मार्तंड जगताप यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सरपंच रमेश भोईटे, पाणी फाऊंडेशनचे प्रणेते मार्तंड जगताप, माढेश्वरी बँकेचे संचालक गणेश काशीद, तात्यासाहेब भोईटे,अमोल उमाटे, नितीन कदम, विलास कौलगे, रमेश उमाटे, रवींद्र चव्हाण, राजाभाऊ लवटे, किरण चव्हाण, सुधाकर मस्के, पांडुरंग कौलगे, अविनाश कदम, अरुण माने, पप्पू कौलगे, बंडू भोरे, वैभव कौलगे,गोरख थोरे, रोहीदास जाधव, जाफर पटेल, आप्पा पवार, अनिल क्षीरसागर, गणेश भोईटे, बिपिन कदम, भारत मुळे, श्रीमंत कौलगे, आश्रम भोईटे, मानसिंग जगताप यांच्यासह समस्त ग्रामस्थ व युवक उपस्थित होते.

# कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील १३२ शासकीय औद्योगिक संस्थांना नवी ओळख

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील १३२ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण यशस्वी पणे करण्यात आले आहे. प्रथम १४ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाद्वारे घेण्यात आला होता. महाराष्ट्रातील फक्त २ औद्योगिक संस्था सोडल्या तर इतर औद्योगिक संस्थांना या आधी कोणत्याही प्रकारची नावे नव्हती. त्यांनतर कौशल्य विकास विभागाद्वारे महाराष्ट्रातील शासकीय औद्योगिक संस्थांसाठी नागरिकांकडून नावाबाबत सूचना मागवण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे राज्यातील १३२ आयटीआयचे नामकरण करण्याचा निर्णय आज जाहीर करण्यात आला. त्यानुसार अकोला, अमरावती, कोल्हापूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, जालना, धाराशिव, धुळे, नंदुरबार, नागपूर, नांदेड, नाशिक, परभणी, बीड, बुलढाणा, भंडारा, मुंबई उपनगर, यवतमाळ, रत्नागिरी, रायगड, लातूर, वर्धा, वाशिम, सांगली, सातारा, सोलापूर आणि हिंगोली जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक संस्थांना नवीन ओळख मिळाली.

# नातेपुते ग्रामीण रुग्णालयात महिला बाबत अडचणी, आरोग्य मंत्री यांना निवेदन

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्ह्याचे कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड यांना नातेपुते व परिसरातील नागरिकांनी ग्रामीण रुग्णालय येथे महिला रुग्ण यांची तेथील नेमलेले डॉक्टर योग्य प्रकारे दखल घेत नाहीत महिला रुग्णांची प्रसूती बाबत अनेक अडचणी येतात या विषयी याविषयी तक्रारी केल्या होत्या. त्याबाबत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्री प्रकाश आबिटकर यांना अक्षय भांड यांनी नातेपुते ग्रामीण रुग्णालयात होत असणाऱ्या महिला रुग्णांची हेळसांड याविषयी निवेदन दिले.सदर देण्यात आलेल्या निवेदनामध्ये म्हणण्यात आले आहे की, गेली अनेक वर्षापासून नातेपुते ग्रामीण रुग्णालयामध्ये महिलांच्या प्रसूतीबाबत अनेक अडचणी येत आहेत. अपुरी यंत्रणा, डॉक्टरांकडून प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांकडे जाणूनबुजून दुर्लक्षित करणे, कोणत्याही आजाराबाबत रुग्ण रुग्णालयात आल्यानंतर तात्पुरते उपचार केले जातात व रूग्णांच्या उपचाराबाबत टाळाटाळ केली जाते, डॉक्टरांची वाट बघत पेशंटला तासंतास बसावे लागते, रात्रीच्या वेळेस एखादा अति संवेदनशील पेशंट आला तर डॉक्टर उपलब्ध नसतात, डॉक्टरांची व स्टाफची पेशंटसोबत वर्तवणूक बरोबर नसते अशी ओरड नागरिकांकमधून येत आहे. या भोंगळ कारभाराबाबत सिव्हिल सर्जन यांच्या कानावर घालून सुद्धा याकडे दुर्लक्ष केले जात आहे.



तरी त्वरित नातेपुते ग्रामीण रुग्णालयाची कसुन चौकशी व्हावी व जे दोषी आढळतील त्यांचे कायमस्वरूपी निलंबन करावे व आपण या विषयामध्ये स्वतः लक्ष घालावे असे विनंती आशयाचे निवेदन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेस सोलापूर जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड यांनी भेट घेऊन निवेदन दिले. सदर देण्यात आलेल्या निवेदनाची गंभीर दखल घेऊन आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी नातेपुते ग्रामीण रुग्णालय महिला रुग्ण यांची प्रसूती व इतर आजाराबाबत होत असलेला निष्काळजीपणा याविषयी सोलापूर सिव्हिल सर्जन यांना आदेश पत्र काढून नातेपुते ग्रामीण रुग्णालयात वरील होत असलेल्या तक्रारी निवेदनाबाबत चौकशी करण्याचे आदेश सिव्हिल सर्जन यांना देण्यात आले आहेत.

# भुताष्टेच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत चिमुकल्यांचा कलाविष्कार

## सुंदर व आकर्षक नृत्याने जिंकली उपस्थितांची मने

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भुताष्टे या ठिकाणच्या वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात चिमुकल्यांनी सादर केलेल्या सुंदर व आकर्षक नृत्य व गीतांनी उपस्थितांची मने जिंकत वाहवा व शाबासकी मिळवली.

या सदाबहार कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच मंदाकिनी सुरेश यादव यांच्या हस्ते करण्यात आले.सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने मराठी,हिंदी गाणी व समूह नृत्य सादर केले.छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, विद्यार्थ्यांची वेशभूषा अत्यंत उत्कृष्ट व आकर्षक होती. विद्यार्थ्यांच्या कलेला ग्रामस्थ, पालक व महिलांनी उत्कृष्ट पद्धतीने दाद देत मनापासून कौतुक व अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्रीनिवास मोहिते सहशिक्षिका माधुरी वागज-गुंड,सत्यवान सरवदे यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले.

यावेळी सरपंच मंदाकिनी यादव,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उमेश यादव, तंटामुक्तीचे अध्यक्ष सुधीर यादव,विठ्ठलराव शिंदे प्राथमिक पतसंस्थेचे संचालक सुधीर गुंड, पोलीस पाटील विशाल यादव, शाळा व्यवस्थापनचे माजी अध्यक्ष बळीराम यादव,माजी सरपंच दिलीप यादव,अरणच्या मुख्याध्यापिका शांता वाघमोडे, कल्पना घाडगे,गोरख राऊत यांच्यासह ग्रामस्थ,पालक, युवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाल बावटा बांधकाम कामगार युनियन मार्फत मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबीयांची आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने लाल बावटा बांधकाम कामगार युनियनने पुढाकार घेऊन मोफत रक्त तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सर्व नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबीयांनी लाभ घेतल्याची माहिती युनियनचे कॉ.अमित मंचले यांनी दिली.

लाल बावटा बांधकाम कामगार युनियन सिटू सोलापूर व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.15/1/2025 रोजी तपासणी ते उपचार आरोग्य योजना मोफत रक्त तपासणी शिबिर मसिहा चौक मोदी येथे आयोजित करण्यात आले.या शिबिरामध्ये 224 बांधकाम कामगारांनी व त्यांच्या परिवारासह तपासणी व मोफत औधोपचाराचा लाभ घेतले.या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कॉ. एम एच शेख प्रा. अब्राहम कुमार, कॉ शंकर म्हेत्रे ॲड. अनिल वासम आदींची उपस्थिती होती.

सक्रीय सहभाग व विशेष सहकार्याबद्दल युनियन यांच्या वतीने अमित मंचले यांनी आरोग्य विभागाच्या सौ.संध्या जाधव व त्यांचे वृंद यांचे मनपूर्वक आभार मानले. सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी अजय भंडारे, सिमोन पोगुल गौतम जगले, रवि भंडारे ,मसिहा तरूण मंडळाचे सर्व सदस्य व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# रेणुका सार्वजनिक वाचनालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** लक्ष्मीदहिवडी,ता.मंगळवेढा येथील रेणुका सार्वजनिक वाचनालयात राजमाता जिजाऊ आऊसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिमेचे पूजन ॲड.राजू कुलकर्णी यांचे हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी कैलास मसरे, ईश्वर बनसोडे, बसवेश्वर पाटील, विकास गायकवाड, नागेश कस्तुरे, सोमनाथ तोडकरी, राजू बुरकुल, तुकाराम होनमाने,राजू आदलिंगे, लक्ष्मण लोहार, विनोद सोनवले आदी उपस्थित होते.

## जाहीर प्रसिध्दीकरण

जन्म-मृत्यू/कावि१८/२४

**अनगर येथील मे. अपर तहसिलदार सो अनगर यांचे न्यायालयात**

श्री. पोपट कृष्णा सालगुडे,रा. कुरणवाडी (अनगर) ता. मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरूध्द**

मुख्याधिकारी नगर पंचायत अनगर,ता. मोहोळ जि.सोलापूर } **सामनेवाला**

यातील अर्जदार यांनी जन्म व मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे १३(३) या प्रमाणे अर्ज या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांची मुलगी कु.भाग्यश्री पोपट सालगुडे यांचा जन्म दिनांक १६/०९/२००४ रोजी मौजे कुरणवाडी (अनगर) ता. मोहोळ येथे अर्जदार यांच्या घरीच झालेला आहे. तसेच रेकॉर्ड ला देखील कर्मचा-यांनी जन्माची नोंद घेतलेली नाही. अर्जदार यांचा जन्म/मृत्यु नोंदणीचा दाखला आवश्यक आहे. परंतु सदरची नोंद जन्म/मृत्यू नोंदणीचे रजिस्टर मध्ये झालेली नसल्याने अर्जदार यांनी त्यांची मुलगी कु.भाग्यश्री पोपट सालगुडे यांचा जन्माबाबत सामानेवालाच्या जन्म/मृत्यू नोंदणी अभिलेखात जन्माची नोंद होणेकामी आदेश देणेसाठी अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे. सदरच्या अर्जास कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा मी कोर्टात नेमलेली तारीख १३/०२/२०२५ रोजी समक्ष हजर राहून म्हणणे मांडावे अन्यथा मी कोर्ट जन्माची नोंद होणेबाबत योग्य ते आदेश करतील यांची नोंद घ्यावी. हि जाहीर नोटीस दिली असे १०/०१/२०२५


(शिक्का)

**सही /-**
**अपर तहसिलदार अनगर**



छत्रपती संभाजी राजे सार्वजनिक वाचनालय बावी( आ)या वाचनालयात शिक्षणा व्यतिरिक्त अवांतर शिक्षण शिक्षणपंधरवडा निमित्त शरदचंद्रजी पवार विद्यालय बावी आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बावी आ तर्फे ग्रंथ ग्रंथालयात सदिच्छा भेट व आवडीने वाचनीय साहित्याची निवडक ग्रंथ वाचनास उपलब्ध करून दिले

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे राष्ट्रवादीतून पुढे आलेले एक नेते
२) एक हिंदी सिनेनिर्माते-** चोप्रा ३) डाळ अथवा भात शिजवण्यासाठी याचा वापर करतात ४) आडातून पाणी खेचण्याचे चक्राकार साधन
५) सलमान खानचा थोरला भाऊ
६) भारतीय क्रिकेट टीममधील ऐंशीच्या दशकातील अष्टपैलू खेळाडू ११) दात
१३) मोठी पेटी
१६) पाठवणे, **** करणे
२०) सूट, मोकळीक
२२) महादेवाचे एक नाव २४) महाराष्ट्रातील एक जिल्हा
२७) शरीर, काया
२८) कार उलट लिहा
२९) चांगला रूचकर स्वयंपाक बनविणारी स्त्री
३०) कपडे धुण्याचा एक साबण
३२) समुद्र ३३) बंदूक (इंग्रजीत)
३४) चरण ३६) हळू, मंद गतीने
३७) शुभकार्यासाठी उभारलेला छत
३९) सातत्याने, नेहमी
४१) पक्ष्याचे पंख, परंतु (हिंदीत)
४२) ईश्वर (हिंदीत),४६) श्रीविष्णू पत्नी
४७) गंध, परिमळ

**आडवे शब्द :** १) हेराफेरी चित्रपटातील एक प्रमुख अभिनेता
५) अभिनेता असलेला अमिताभ बच्चन यांच्या मुलाचे नाव ७) संशय ८) एक म्हण-*** तो वजीर ९) एक म्हण-बळी तो कान ** १०) जरचा साथीदार १२) घोडेसवारी, फेरफटका १४) ख्रिश्चन बांधवाचा पवित्र धर्मग्रंथ १५) एखाद्या कामासाठी स्वत:जवळचे पैसे खर्च करणे-***मोड करणे १७) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक १८) उणीव, टंचाई १९) धान्याचा ढीग २१) स्पेशल, विशेष २३) उमर (मराठीत) २५) महिलांचा नाकात घालण्याचा एक दागिना २६) वतनाचा मालक २९) शेतातील कामाचा हंगाम ३०) खलनायक (इंग्रजीत) ३१) तक्रार, फिर्याद (हिंदीत) ३१) फर्निचरसाठी या झाडाचे लाकूड वापरतात
३३) चूक, चुकीचे (हिंदीत) ३४) ब्रेड (मराठीत)
३५) मान (हिंदीत) ३६) दुधावरील मलई ३७) आठवड्यातील एक दिवस-***वार, एक उपग्रह ३८) वाळूचे मैदान ३९) प्रॅक्टीस (मराठीत) ४०) कडूच्या विरूध्दार्थी शब्द ४१) माघारी देणे, माघारी करणे-*** देणे ४३) श्रवणेंद्रिय
४५) कालच्या अगोदरचा दिवस ४८) लिंबू पाण्याचे पेय
४९) भारताचे माजी कृषिमंत्री-*** पवार
५०) महिना

## सुडोकु - 151

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 9 | | 1 | | | 3 | | |
| | | | | 7 | | | | |
| | 3 | | 2 | | 8 | 5 | | |
| | 4 | 6 | 5 | | | 8 | 3 | 2 |
| 1 | 2 | 8 | | 3 | 6 | | | |
| | | | | 2 | | 1 | | 6 |
| | 5 | 1 | 7 | 6 | | 9 | | |
| | | 9 | | | | 2 | 5 | |
| 2 | 8 | | 4 | | 9 | 6 | 1 | 3 |

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:**
9881361260


**R.K कन्स्ट्रक्शन्स्**



इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...
- बांधकाम नकाशा
- इंटेरियर डिझाईन
- 3 D डिझाईन
- कॉन्ट्रॅक्टर वर्क्स
- बांधकाम परवाना
- स्टील डिझाईन
- इस्टिमेट
- साईट सुपरव्हिजन
- ब्लु प्रिंटस्
- लेव्हल सर्व्हिसेस

संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)



**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# जयहिंद विद्यालय येथे स्कूल कनेक्ट संपर्क अभियान



**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या 122 व्या जयंतीनिमित्त श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बाशीर्चे जयहिंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, क. तडवळे येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी यांच्या संयुक्त विद्यमाने स्कूल कनेक्ट संपर्क अभियान कार्यशाळा आयोजित करण्यात आलेले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य गाढवे आर.डी.सर हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून वसंतराव काळे महाविद्यालयाचे ढोकी चे प्राचार्य डॉ. हरिदास फेरे लाभले तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा.डॉ.बालासाहेब मैंद,प्रा.डॉ.इंगळे पी.पी.व प्रा.डॉ. देशमुख बी.एन.सर उपस्थीत होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता 12 वी तील विद्यार्थिनी प्राची कोरे यांनी केले.प्रा.डॉ.इंगळे प्रस्तावना केली.कार्यक्रमांमध्ये जिल्हास्तरीय आट्यापाट्या, 4100 मी.रीलेव 4400 मी.रीले स्पर्धेत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.यावेळी वसंतराव काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास फेरे सर यांनी एन.इ.पी. म्हणजे "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020"या अंतर्गत विद्यार्थ्यांना भविष्यातील शिक्षणाच्या सुविधा, रोजगार व उद्योगधंद्यासाठी शैक्षणीक धोरण कसे उपयुक्त आहे हे सांगितले .यावेळी प्रा. डॉ.बालासाहेब मैंद,प्राचार्य गाढवे आर. डी.यांचे देखील मोलाचे मार्गदर्शन लाभले.यावेळी आभार प्रा.पठाण आय.एल.यांनी मांनले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व प्राध्यापिका व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# संपत्तीचे वारसदार होण्यापेक्षा सुसंस्काराचे वारसदार बनणे श्रेष्ठ-पद्मजादेवी मोहिते-पाटील

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती झाली पाहिजे, या हेतूने तालुक्यातील सर्व संस्थांची सहकार तत्त्वावर उभारणी केली. आज त्यांच्या विचारांचा वारसा चालविण्याची गरज आहे.

संपत्तीचे वारसदार होण्यापेक्षा सुसंस्काराचे वारसदार बनणे कधीही श्रेष्ठ असल्याचे मत संस्थेच्या मार्गदर्शका सोलापूर विद्यापिठाच्या सिनेट सदस्य पद्ममजा देवी मोहिते - पाटील यांनी व्यक्त केले.

त्या नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयात सहकार महर्षी यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या पत्रकारांचा सन्मान व क्रीडा स्पधेर्चे आयोजन या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होत्या. यावेळी

प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त प्राचार्य डॉ चंद्रकांत कोळेकर, प्र प्राचार्य डॉ. रज्जाक शेख, पत्रकार सुनील राऊत, लतिब नदाफ, निनाद पाटील, एन. के. साळवे, अभिमन्यू आठवले,श्रीकांत बाविस्कर, मनोज राऊत,समीर सोरटे, सुनील गजाकंस, सुनील ढोबळे, संजय पवार हे उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून पद्मजादेवी मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते प्रत्रकारांचा सन्मान घेण्यात आला.



सामान्य माणसाविषयी सहकार महर्षी यांच्या मनात अपार श्रध्दा होती. शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घेण्यासाठी ते तत्पर असत. वंचितांचे, उपेक्षितांचे आणि शेतकऱ्यांचे- शेत मजुरांचे जीवनमान उंचावले जावे यासाठी सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर करणे आवश्यक आहे ही बाब लक्षात घेऊन त्यांनी अकलूज येथे शैक्षणिक संकुल उभा केले.

तसेच प्रा.डॉ दत्तात्रय साळवे व विद्यापीठ भुगोल या विषयात सुवर्णपद विजेता अजय कुंभार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच सहकार महर्षी यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे कबड्डी, खो-खो आदी क्रीडा स्पर्धा प्राध्यापक पैलवान नारायण माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली तसेच काव्यवाचन, वक्तृत्व, गायन, निबंध लेखन, पुष्प सजावट,रांगोळी, हस्ताक्षर, पारंपारिक दिन या सारखे विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रज्जाक शेख यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या असून कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी प्रा नितीन देशपांडे, प्रा. पुष्पा सस्ते, प्रा. रब्बाना शेख, प्रा. दयानंद साठे, प्रा राजेंद्र साठे, प्रा. उत्तम सावंत, प्रा जगदीशचंद्र मुळीक, प्रा श्रीकांत पवार,प्रा डॉ बाळासाहेब निकम यांनी विशेष परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजेंद्र खंदारे यांनी केले तर प्रा. सुहास नलवडे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# कुरुल येथे राजमाता जिजाऊ आऊसाहेबांच्या चरणी खा. प्रणिती शिंदे नतमस्तक

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील कुरूल येथील मावळा प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमास खासदार प्रणिती शिंदे उपस्थित राहुन राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नतमस्तक झाल्या.

सर्वांचे स्वागत रामभाऊ लांडे यांनी केले. तसेच यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनींचा व सोलापूर जिल्हा प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी आपले विचार व्यक्त करताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविण्यात माँसाहेब जिजाऊंचा मोलाचा वाटा होता. हिंदवी स्वराज्याचं बीज छत्रपती शिवाजी महाराजांच्या



मनात रोवलं, त्यांच्या अंगी अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती बाणवली त्याला खतपाणी दिलं, जोपासलं वेळप्रसंगी रणांगणात तलवारही हाती घेण्यात त्या मागे हटल्या नाहीत. त्यांनी शिवरायांच्या मनावर कर्तव्यनिष्ठा आणि सर्वांना एकत्र घेऊन वाटचाल करण्याचे संस्कार केले आणि त्यातूनच १८ पगड जातींना एकत्र घेऊन हिंदवी स्वराज्य निर्माण केले. आदर्श माता, कुशल राज्यकर्त्या स्वराज्य जननी जिजाऊ माँसाहेब यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, त्यांचाच आदर्श घेऊन आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहेत. अश्याच कर्तृत्ववान भगिनींचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश अप्पा पवार, रामभाऊ लांडे पाटील, डॉ. स्मिताताई पाटील, शिवाजी जाधव, दीपक जाधव, दीपक पाटील, बाळासाहेब लांडे, तात्यासाहेब बाबर, मेजर निकम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार 2024 साठीप्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**मुंबई,(कटूसत्य वृत्त):-** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पधेर्साठी दिनांक 1 जानेवारी, 2024 ते 31 डिसेंबर, 2024 पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/ वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याची शेवटची तारीख 31 जानेवारी, 2025 अशी आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - 32, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अजार्चे नमुने dgipr. maharashtra.gov.in U www.maharshtra.gov.in तसेच https://mahasamvad. in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाची लोकाभिमुख कामगिरी

## सन २०२४ मध्ये १ हजार ५२८ बदल अहवाल निर्णित

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सार्वजनिक न्यास नोंदणी कर्यालय, सोलापूर तर्फे सन २०२४ मध्ये विविध लोकाभिमुख योजना राबविण्यात आल्या आहेत. यामध्ये एकूण १ हजार ५२८ बदल अहवाल निर्णित करण्यात आले. धमार्दाय आयुक्त , मुंबई यांचे निदेर्शानुसार घेण्यात आलेल्या तीन विशेष मोहिमे अंतर्गत १ हजार ८२ बदल अहवाल निर्णित करण्यात आले असल्याची माहिती धमार्दाय उपायुक्त प्रविण कुंभोजकर यांनी दिली.

सदर निर्णित केलेल्या बदल अजार्चे आदेश डिजीटल स्वाक्षरीने धमार्दाय संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले. जेणेकरुन नागरीकांना निर्णित केलेल्या बदल अजार्चे आदेश कुठेही वाचणे सहज शक्य झाले आहे. तसेच ६९३ संस्था तथा न्यास ऑनलाईन प्रणालीतून नोंदणी करण्यात आले. संस्था तथा न्यास नोंदणीचे ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. विविध स्वरुपाच्या प्राप्त तक्रारींचे न्यास नोंदणी निरीक्षक यांचेमार्फत चौकशी करुन ३३० प्रकरणे निर्गमीत झाली. प्रामुख्याने संस्था आणि न्यास नोंदणीचे सर्व कामकाज ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यात आले आहे.

तसेच गणेश उत्सव, नवरात्र उत्सव आणि इतर उत्सवाकरिता तात्पुरत्या परवानग्या देणेची प्रक्रिया देखील सोलापूर येथे प्रथम संपूर्णतः ऑनलाईन पध्दतीने करण्यात आली आहे. या अंतर्गत एकूण ९०९ तात्पुरत्या परवानग्या देण्यात आल्या.

यासाठी अर्ज ऑनलाईन भरण्याची सोय असल्याने व तात्पुरत्या परवानग्या अर्जदारांच्या ई-मेल वर प्राप्त होत असल्याने अर्जदारांना न्यास नोंदणी कार्यालयात एकदाही येणेची गरज भासली नाही.

तसेच शासनाचे विधी आणि न्यास विभागाच्या धोरणानुसार लवकरच सर्व अभिलेख संगणीकीय करण्याचे कामकाज सुरु होणार असून त्यासाठीची प्राथमिक तयारी न्यास नोंदणी कार्यालयात युध्द पातळीवर सुरू आहे. विधी व न्याय मंत्री यांचे निदेर्शानुसार न्यास नोंदणी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली धमार्दाय इस्पितळामार्फत गतवर्षी एकूण १८२ मोफत आरोग्य शिबीरांच्या यशस्वी आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये सुमारे ८ हजार २१९ रुग्णांनी लाभ घेतला.

त्याचप्रमाणे कारागृहात दोन आरोग्य शिबीरांची आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात सुमारे ७२८ कैदयांना आरोग्य शिबीराचा लाभ मिळाला. सार्वजनिक विभागाचे काम जास्तीत जास्त लोकाभिमुख पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत. या धोरणास धमार्दाय आयुक्त अमोघ कलोती व धमार्दाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे श्रीमती रजनी क्षीरसारगर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन आणि सहकार्य लाभत असल्याचे धमार्दाय उपायुक्त प्रविण कुंभोजकर यांनी सांगितले.

# शंभूराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** छावा प्रतिष्ठान आयोजित छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, या कार्यक्रमासाठी बार्शी पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, पी एस आय उमाकांत कुंजीर, बार्शी नगर परिषदेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, दैनिक संचार चे उपसंपादक सचिन वायकुळे, पत्रकार संजय आबा बारबोले,मा.नगरसेवक मदन गव्हाणे व संतोष बारंगुळे, वृक्ष संवर्धन समिती अध्यक्ष उमेश काळे, जाणीव फाऊंडेशन चे मामासाहेब हवालदार, बापूसाहेब कदम, विजय राऊत हे उपस्थित होते, यावेळी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या मूतीर्ला सनई चौघड्याच्या सुरात दुग्ध व जलाभिषेक करण्यात आला, तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल व्यक्ती व संघटनेचा सन्मान करण्यात आला त्यात ऑस्ट्रेलिया या ठिकाणी आयर्न मॅन स्पर्धेत बाशीर्ची आणि भारत देशाची सरशी करणारे आयर्नमॅन महावीर कदम तसेच गोमातेची मनोभावे सेवा करणारे गोमातेची काळजी घेणारे गोसेवक किशोर अकोस्कर तसेच बाशीर्तील समाज कार्यात अग्रेसर असणाऱ्या त्रिमूर्ती प्रतिष्ठान यांच्या संपूर्ण टीम चा देखील सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रम स्थळी मसाला दुधाचे वाटप याप्रसंगी करण्यात आले, मामासाहेब हावलदार आणि बाळासाहेब चव्हाण यांनी बोलताना छावा प्रतिष्ठान च्या कायार्साठी शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमासाठी सर्व छावा प्रतिष्ठान चे पदाधिकारी यांच्यासह सर्व शंभू भक्त यांनी परिश्रम घेतला.

# शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने राज्याभिषेक सोहळा साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 16 जानेवारी रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या 344 व्या राज्याभिषेक सोहळा निमित्त शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत यांच्या हस्ते व अँड. बाबासाहेब जाधव श्रीकांत घाडगे नाना काळे अमोल शिंदे राजन जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या 344 वा राज्यभिषेक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ सकाळी ध्वजवंदन करून जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली त्यानंतर छत्रपती



संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळ्या निमित्त विविध सन्माननीय अतिथी यांच्या सत्कार करण्यात

आला तसेच आनंदोत्सव म्हणून समितीचे वतीने मिठाईवाटप करण्यात आले सकाळी नऊ ते दुपारी चार वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात सत्तर जणांनी रक्तदान केले रक्तदात्यांना छत्रपती यांची मूर्ती भेट देण्यात आली. यावेळी राज्याभिषेक समितीचे शिरीष जगदाळे, अमोल जाधव बाळासाहेब गायकवाड गोवर्धन गुंड प्रकाश ननवरे श्याम कदम संभाजीराजे भोसले अजय सोमदळे छत्रुघन माने श्रेयस माने शेखर जगदाळे सचिन चव्हाण संतोष आतकरे सोमनाथ राऊत मोनाली धुमाळ मनीषा कोळी उज्वला साळुंखे लता ढेरे माधुरी चव्हाण आदी उपस्थित होते.

# विसावा न घेता चेतन आलमेलकर यांनी सिध्दरामेश्व रांच्या चरणी आपली सेवा अर्पण केली

**सोलापुर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरातील काडादी चाळ येथे राहणाऱ्या चिरंजीव चेतन मल्लिनाथ आलमेलकर यांनी पहिला नंदिध्वज श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिरा पासून ते जुनी मिल कंपाउंड येथे बोला बोला एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र सिध्देश्वर महाराज की जय हर्र हर्र हर्र च्या जयघोषात त्यांनी विसावा न घेता नंदीध्वज उचलुन श्री सिध्दरामेश्व रांच्या चरणी आपली सेवा अर्पण केली यावेळी , उपस्थित चंद्रशेखर आलमेलकर,



मल्लिनाथ आलमेलकर, राजशेखर आलमेलकर, चिदानंद आलमेलकर, केदार आलमेलकर, साहिल आलमेलकर, अक्षय कराळे, धनंजय कोळकूर , श्रीशैल वर्दा, समर्थ पकवे , महानंदा आलमेलकर, शिल्पा आलमेलकर, भाग्यश्री आलमेलकर, वैष्णवी आलमेलकर, चैत्राली आलमेलकर, निकिता कराळे , ईश्वरी करळे यांनी विसावी पुर्ण झाल्यानंतर हार आणि गुलाल उधळुन त्याचे कौतुक केले.

# हरियाणाचा रजतसिंग त्रिमुर्ती कुस्ती चषकाचा मानकरी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस (जि. सोलापूर) चा मल्ल राहुल सुळ विरूध्द हरियाणाच्या मल्ल रजतसिंग यांच्यामध्ये त्रिमुर्ती चषकासाठी अत्यंत अटीतटीच्या झालेल्या कुस्ती स्पर्धेत ९ गुणांवरती रजतसिंगने विजय मिळवीत त्रिमुर्ती चषकावर नाव कोरले. त्यास प्रथम क्रमांकाचे रोख २ लाख रुपए व सन्मान चिन्ह देण्यात आले. यामध्ये सुरूवातीपासूनच रजतसिंह याने राहुल सुळ वरती जोरदार आक्रमण केले होते. वारंवार कब्जा घेत रजतने राहुलची दमछाक केली. निकाली कुस्तीसाठी दिलेल्या वीस मिनिटाच्या वेळेत दोघांनीही एकमेकाची ताकत आजमावली. त्यानंतर तीन-तीन मिनिटाचे दोन डाव गुणांच्या कुस्ती साठी देण्यात आले. व यामध्ये नऊ गुणांनी रजतसिंग विजयी ठरला. उपविजेता राहुल सुळ यास रुपये दीड लाख व सन्मान चिन्ह देण्यात आले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरणासाठी रुस्तमै हिंद , पद्मश्री पुरस्कार मल्ल सतपाल, माजी उपमुख्यमंत्री



विजयसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील प्रमुख उपस्थित होते.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ यांच्या वतीने दि. 12 ते 14 जानेवारी या कालावधीत शंकरनगरच्या शिवतीर्थ आखाड्यात अखिल भारतीय त्रिमुर्ती चषक व वजन गट कुस्ती स्पधेर्चे आयोजन केले होते.

शंकरनगरच्या शिवतीर्थ आखाड्यात या स्पधेर्साठी महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, राष्ट्रकुल विजेता रामचंद्र सारंग, उपमहाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, वसंत जाधव, उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, यांच्यासह परिसरातील विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेत विविध वजनगटात 578 व खुल्या गटात 62 अशा एकूण 640 मल्लांनी सहभाग घेतला.

तिसऱ्या व चौथ्या क्रमांकासाठी वैभव माने व प्रमोद सुळ यांच्यातील कुस्तीत प्रमोद सुळ विजयी ठरला. त्याला १ लाख रुपए व वैभव माने यास ५० हजार रूपयांचे बक्षिस देण्यात आले.

वजन गटातील कुस्ती स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे २५ किलो श्रेयस कदम वेळापुर, २८ किलो विराज पवार निमगाव, 30 किलो मेघराज तांबिले अकलूज, ३२ किलो युवराज वरेकर खुडुस, ३५ किलो संस्कार जाधव रुई, ४० किलो आदित्य सावंत असुन, ४५ किलो हनुमंत जाधव खुडुस, ५० किलो अक्षय चव्हाण खुडुस, ५५ किलो देविदास जाधव कलेढोण, ६० किलोअविराज माने खुडुस, ६५ किलो पवन धायगुडे करकंब ७० किलो सोमनाथ गोरड गोरडवाडी, ७५ किलो रामचंद्र नंदगौड मंगळवेढा, ८० किलो कृष्णा बनसोडे मंगळवेढा, ८५ किलो अविनाश गावडे पुणे यांनी विजय संपादन केला. विजेत्या व उपविजेत्या मल्लांनाही रोख रकमेची बक्षीसे देण्यात आली.

दिल्लीचे रुस्तमै हिंद मल्ल सतपाल म्हणाले, मोहिते पाटील कुटुंबीय मागील 46 वषार्पासून या कुस्ती स्पधेर्तून केवळ पैलवानच घडवत नाहीत तर देशसेवा ही करीत आहेत. तरुणांना तंदुरुस्त ठेवून नवी पिढी घडवीत आहेत. मोठी स्पर्धा व मोठी बक्षिसे इथे आहेत. मी 3 हजार कुस्त्या जिंकलो. माझे पहिले बक्षीस चारआणे होते. आणि शेवटच्या कुस्तीत पाच लाख होते. इथे मात्र खूप मोठी बक्षिसे पैलवानांना दिली जातात.

या स्पर्धेमध्ये रोहिदास आमले, राम सारंग, प्रकाश घोरपडे, तानाजी केसरे, बाजीराव पाटील, चंद्रकांत मोहोळ, नितीन शिंदे, सद्दाम जमादार, अमोल पवार, मकनिक पाटील, बाजीरावं पाटील, महेश जाधव, महेश पाटील, शंकर गोनुगडे, संभाजी मगदूम, दत्ता एक्षिगे, प्रवीण निकम यांनी पंच म्हणून काम पहिले. कुस्तीचे सूत्रसंचालन अशोक धोत्रे यांनी केले.

# शिवामृतच्या प्रतिदिन एक लाख बॉटल उत्पादन क्षमतेच्या अत्याधुनिक फ्लेवर्ड मिल्क प्लॉटचे विजयदादांच्या हस्ते उद्घाटन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघाच्या प्रति दिनी एक लाख बॉटल उत्पादन क्षमतेच्या अत्याधुनिक फ्लेवर्ड मिल्क प्लांटचे उद्घाटन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहाकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंती निमित्त शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघाने विजयनगर - अकलूज येथे अत्याधुनिक फ्लेवर मिल्क प्लांटची ऊभारणी केली असून या प्लांट उद्घाटनप्रसंगी संघाचे मार्गदर्शक संचालक राजसिंह मोहिते पाटील, बँक ऑफ बडोदाचे रिजनल मॅनेजर संजीवन कुमार , शाखाधिकारी राजकिशोर सिंग, चेअरमन खा. धैर्यशील मोहिते पाटील, व्हा. चेअरमन दत्तात्रय भिलारे, कार्यकारी संचालक रविराज इनामदार देशमुख, मुंबईच्या मिटीली इंटर नॅशनल कंपनीचे संचालक विकास पाटील यांच्यासह संघाचे संचालक , अधिकारी व कामगार उपस्थित होते.

खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी



फ्लेवर्ड मिल्क प्लांटची माहिती देताना सांगितले की, या प्लांटची दैनंदिन उत्पादन क्षमता एक लाख बॉटल असून यासाठी दररोज 20 हजार लिटर दूध लागणार आहे . शिवामृत या बॉटल मधून बटर स्कॉच , बदाम, पिस्ता, केशर, स्टॉबेरी, पायनापल, चोकलेट, व्हेनेला, बनाना हनी, थंडाई, बदाम ड्रिंक व क्लासिक कॉफीचे उत्पादन घेणार आहे . आज बदाम ड्रिंक व क्लासिक कॉफीचे उत्पादन सुरू करण्यात आले आहे . बँक ऑफ बडोदाचे रिजनल मॅनेजर संजीवन कुमार म्हणाले, माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्था मुळे बँक ऑफ बडोदाची अकलूज शाखा पुणे विभागात प्रथम क्रमांकावर राहिली आहे. या तालुक्यातील सहकारी संस्थाच्या माध्यमातून नवनवीन तंत्रज्ञान विकसीत करुन विकासाला गती दिली जाते . शेतीपूरक रोजगार निर्मिती केली जाते. त्यामुळे अर्थव्यवस्थेला गती प्राप्त होते . बँक ऑफ बडोदा नेहमीच अशा उपक्रमशील उद्योगाला आर्थिक मदत करते. शिवामृत ही आमची जुनी संस्था आहे . त्यांच्या नवनवीन प्रोजेक्टसाठी आम्ही नक्कीच मदत करु. विकास पाटील म्हणाले, गेल्या वर्षभरापासून शिवामृतच्या उत्पादनांना चांगली बाजारपेठ मिळवून देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे . फ्लेवर्ड मिल्कला ग्राहकांची चांगली मागणी आहे.

प्रास्ताविक संचालक हरिभाऊ मगर यांनी केले तर आभार व्हा चेअरमन दत्तात्रय भिलारे यांनी मानले.

# सैनिकी मुलींचे व मुलांचे वसतिगृहासाठी मानधनावर पहारेकरी पदाची भरती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलींचे व मुलांच्या वसतिगृह सोलापूर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रिक मानधनावर पहारेकरी 02 (प्रत्येकी एक पद) पदे भरावयाचे आहे. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह गुरुवार दि. 23 जानेवारी 2025 पुर्वी जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे.

सदर पदासाठी पहारेकरी पदाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल मानधन रुपये 20 हजार 886 रू. प्रतिमहा असेल. तसेच हे पद निवासी आहे. पहारेकरी पदासाठी नियुक्त झालेल्या उमेदवाराने रात्रीचा पहार देणे व मुक्कामी रहाणे आवश्यक आहे.

पहारेकरी पद हे माजी सैनिक ,युध्द विधवा, व माजी सैनिक विधवा पत्नी यांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह कार्यालयात सादर करावे.

पहारेकरी पदा करीता दि .23 जानेवारी 2025 रोजी मुलाखत घेण्यात येईल, तरी उमेदवारांनी स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. सदर पद भरतीसाठी माजी सैनिक, युध्द विधवा , व माजी सैनिक विधवा पत्नी यांना प्राधान्य देण्यात येईल. माजी सैनिक युध्द विधवा व माजी सैनिक विधवा पत्नी उपलब्ध न झाल्यास नागरी जीवनातील उमेदवारांचा विचार केला जाईल. तरी सोलापूर जिल्ह्यातील पात्र व गरजू माजी सैनिक , युध्द विधवा व माजी सैनिक पत्नी यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी केले आहे.